# मिरा भाईंदर महानगरपालिका

## // मालमत्ता व्यवस्थापन विभाग //

## // गोषवारा // दि. ३०|०८|२०२४

**प्रकरण क्रमांक.** ( २४३ ) :- मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेमधील मौजे-चेणे ता.जि. ठाणे येथील स.नं. 98 व 102 मधील खाजगी क्षेत्र 7079 चौ.मी. क्षेत्र नियोजित 18.00 मी. विकासबाह्य योजना रस्ता विकसित करणेकामी भुमिसंपादन पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, 2013 चे कलम 23 नुसार घोषित करावयाच्या निवाडयाची मोबदल्याची रक्कम तसेच 3% आस्थापना शुल्क व 3% सोयी सुविधा शुल्काची रक्कम जमा करणेबाबत. (E492853)

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेमधील मौजे-चेणे ता.जि. ठाणे येथील स.नं. 98 व 102 मधील खाजगी क्षेत्र 7079 चौ.मी. क्षेत्र नियोजित 18.00 मी. विकासबाह्य योजना रस्ता विकसित करणेकामी अंदाजित नुकसान भरपाई रक्कम रू.9,04,57,822/- (अक्षरी नऊ कोटी चार लाख सत्तावन्न हजार आठशे बावीस रूपये मात्र) व 3% आस्थापना शुल्क व 3% सोयी सुविधा शुल्क अशी एकुण रक्कम रू.54,27,468/- (अक्षरी चोपन्न लाख सत्तावीस हजार चारशे अडूसष्ठ रूपये मात्र) मिळून एकुण रक्कम रू.9,58,85,290/- (अक्षरी रू. नऊ कोटी अठ्ठावन्न लाख पंच्याऐंशी हजार दोनशे नव्वद रूपये मात्र) त्या प्रमाणे उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी, ठाणे उपविभाग ठाणे यांचे कार्यालयात जमा करणेबाबत संदर्भिय पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

त्याअनुषंगाने मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीमधील विकास योजने अंतर्गत बाह्य रस्ता संपादन करणेकामी तसेच सार्वजनिक प्रयोजनाकरीता रस्ता विकसित करणेकामी येणाऱ्या खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | तपशील | अंदाजित नुकसान भरपाई रक्कम रू. | 3% आस्थापना शुल्क व 3% सोयी सुविधा शुल्क | एकुण |
|---|---|---|---|---|
| 1 | मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेमधील मौजे-चेणे ता.जि. ठाणे येथील स.नं. 98 व 102 मधील खाजगी क्षेत्र 7079 चौ.मी. क्षेत्र नियोजित 18.00 मी. विकासबाह्य योजना रस्ता विकसित करणेकामी | 9,04,57,822/- | 54,27,468/- | 9,58,85,290/- |
| | एकुण | **9,04,57,822/-** | **54,27,468/-** | **9,58,85,290/-** |

मा. उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी, ठाणे उपविभाग ठाणे यांचे कार्यालयास रक्कम रू.9,58,85,290/- (अक्षरी रू. नऊ कोटी अठ्ठावन्न लाख पंच्याऐंशी हजार दोनशे नव्वद रूपये मात्र) इतकी रक्कम वर्ग करण्यासाठी आवश्यक असलेला निधी नगररचना विभाग यांचे या संबंधितील अभिप्रायान्वये विकास आराखडयात जागा संपादित करणे या लेखाशिर्षा अंतर्गत सन 2025-26 या आर्थिक वर्षात रक्कम रू.16,35,56,863/- (अक्षरी सोळा कोटी पस्तीस लाख छपन्न हजार आठशे त्रेसष्ठ रूपये मात्र) एवढया रक्कमेची तरतुद करण्यात आली असून सदरचा खर्च या लेखाशिर्षातून अदा करता येईल.

सदरील प्रस्तावास प्रशासकीय ठरावाद्वारे मान्यता मिळणेस शिफारस आहे.

(दिपक खांबित)
शहर अभियंता
मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. आयुक्त यांच्या मान्यतेने

प्रशासकीय
मा. महासभा / स्थायी समिती सभा
गोषवारा प्राप्त दि.२९/०९/२०२५ वेळ दु.३.४० वा,
रजिस्टर नोंद अ.क्र.२५० वर्ष २०२५-२६

लिपीक
सचिव विभाग
मिरा-भाईंदर महानगरपालिका

PC-1/25-26/ /14. प्रशासकीय ठराव/गोषवारा-15

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

प्रशासकीय ठराव दिनांक 30/08/2025

**प्रकरण क्र. (283) :- मा. आयुक्त महोदयाकडील कामकाज**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेमधील मौजे-चेणे ता.जि. ठाणे येथील स.नं. 98 व 102 मधील खाजगी क्षेत्र 7079 चौ.मी. क्षेत्र नियोजित 18.00 मी. विकासबाह्य योजना रस्ता विकसित करणेकामी भुमिसंपादन पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, 2013 चे कलम 23 नुसार घोषित करावयाच्या निवाडयाची मोबदल्याची रक्कम तसेच 3% आस्थापना शुल्क व 3% सोयी सुविधा शुल्काची रक्कम जमा करणेबाबत.

**ठराव क्र. (283)**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेमधील मौजे-चेणे ता.जि. ठाणे येथील स.नं. 98 व 102 मधील खाजगी क्षेत्र 7079 चौ.मी. क्षेत्र नियोजित 18.00 मी. विकासबाह्य योजना रस्ता विकसित करणेकामी अंदाजित नुकसान भरपाई रक्कम रू.9,04,57,822/- (अक्षरी नऊ कोटी चार लाख सत्तावन्न हजार आठशे बावीस रूपये मात्र) व 3% आस्थापना शुल्क व 3% सोयी सुविधा शुल्क अशी एकुण रक्कम रू.54,27,468/- (अक्षरी चोपन्न लाख सत्तावीस हजार चारशे अडूसष्ठ रूपये मात्र) मिळून एकुण रक्कम रू.9,58,85,290/- (अक्षरी रू. नऊ कोटी अठ्ठावन्न लाख पंच्याऐंशी हजार दोनशे नव्वद रूपये मात्र) त्या प्रमाणे उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी, ठाणे उपविभाग ठाणे यांचे कार्यालयात जमा करणेबाबत संदर्भिय पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

त्याअनुषंगाने मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीमधील विकास योजने अंतर्गत बाह्य रस्ता संपादन करणेकामी तसेच सार्वजनिक प्रयोजनाकरीता रस्ता विकसित करणेकामी येणाऱ्या खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | तपशील | अंदाजित नुकसान भरपाई रक्कम रू. | 3% आस्थापना शुल्क व 3% सोयी सुविधा शुल्क | एकुण |
|---|---|---|---|---|
| 1 | मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेमधील मौजे-चेणे ता.जि. ठाणे येथील स.नं. 98 व 102 मधील खाजगी क्षेत्र 7079 चौ.मी. क्षेत्र नियोजित 18.00 मी. विकासबाह्य योजना रस्ता विकसित करणेकामी | 9,04,57,822/- | 54,27,468/- | 9,58,85,290/- |
| | एकुण | **9,04,57,822/-** | **54,27,468/-** | **9,58,85,290/-** |

मा. उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी, ठाणे उपविभाग ठाणे यांचे कार्यालयास रक्कम रू.9,58,85,290/- (अक्षरी रू. नऊ कोटी अठ्ठावन्न लाख पंच्याऐंशी हजार दोनशे नव्वद रूपये मात्र) इतकी रक्कम वर्ग करण्यासाठी आवश्यक असलेला निधी नगररचना विभाग यांचे या संबंधितील अभिप्रायान्वये विकास आराखडयात जागा संपादित करणे या लेखाशिर्षा अंतर्गत सन 2025-26 या आर्थिक वर्षात रक्कम रू.16,35,56,863/- (अक्षरी सोळा कोटी पस्तीस लाख छपन्न हतार आठशे त्रेसष्ठ रूपये मात्र) मधून रू.9,58,85,290/- (अक्षरी रू. नऊ कोटी अठ्ठावन्न लाख पंच्याऐंशी हजार दोनशे नव्वद रूपये मात्र) एवढी रक्कम अदा करणेसाठीचे कामाच्या प्रस्तावाचे अवलोकन करण्यात आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतूदी व विशेषतः कलम 452(अ) च्या (1अ) व (1ब) नुसार, महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतूदी व विशेषतः कलम 452 (अ) च्या (1अ) व (1ब) नुसार, महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक :- एमसीओ 2020/प्र.क्र.71 (भाग-2)/नवि- 14 दिनांक 26 ऑगस्ट 2022 अन्वये प्राप्त अधिकारानुसार मी श्री. राधाबिनोद शर्मा, प्रशासक, मिरा भाईंदर महानगरपालिका महासभेच्या अधिकाराचा वापर करून प्रशासनाने सादर केल्यानुसार मौजे-चेणे ता.जि. ठाणे येथील स.नं. 98 व 102 मधील खाजगी क्षेत्र 7079 चौ.मी. क्षेत्र नियोजित 18.00 मी. विकासबाह्य योजना रस्ता विकसित करणेकामी अंदाजित नुकसान भरपाई रक्कम रू.9,04,57,822/- (अक्षरी नऊ कोटी चार लाख सत्तावन्न हजार आठशे बावीस रूपये मात्र) व 3% आस्थापना शुल्क व 3% सोयी सुविधा शुल्क अशी एकुण रक्कम रू.54,27,468/- (अक्षरी चोपन्न लाख सत्तावीस हजार चारशे अडूसष्ठ रूपये मात्र) मिळून एकुण रक्कम रू.9,58,85,290/- (अक्षरी रू. नऊ कोटी अठ्ठावन्न लाख पंच्याऐंशी हजार दोनशे नव्वद रूपये मात्र) रक्कम अदा करणेस प्रशासकिय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

वरील कामाबाबत पुढील कार्यवाही नियमानुसार संबंधित विभागाने विहित पध्दतीने करावी.

नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

(राधाबिनोद अ. शर्मा, भाप्रसे)
प्रशासक तथा आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत मालमत्ता व्यवस्थापन विभागाकडे योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## बांधकाम/ विद्युत विभाग

## दि. ३०/०९ /२०२५

## // गोषवारा //

**प्रकरण क्रमांक.(२४४)** मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विविध सेवा वाहीन्यांनी खोदलेले रस्ते, पावसाळयात पडणारे खड्डे यांची वार्षिक मुदतीने दुरुस्ती करणे. (ई-2416145)

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात विविध ठिकाणी विविध सेवा संस्था पुरवठादारांमार्फत नविन वाहीन्या अंथरणे, फॉल्ट काढणे यासाठी रस्ते खोदण्यात येत असतात. पावसामुळे विविध ठिकाणी रस्त्यांवर खड्डे पडून रस्ते नादुरूस्त होतात. त्यामुळे सदर रस्त्यांवर अपघात होऊ नये म्हणून सदरील रस्त्यांची वेळोवेळी दुरूस्ती करणे आवश्यक आहे. मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील रस्ते दुरूस्ती कामी सन 2022-23 च्या राज्य दर सुचीनुसार रु.50,00,00,000/- इतक्या रक्कमेचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. सन 2025-26 या आर्थिक वर्षाच्या "रस्ते दुरुस्ती देखभाल दुरुस्ती पुर्नपृष्ठीकरण करणे" या लेखाशिर्षातून करावयाचे आहे. मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे सुरू असलेल्या 71/2013 sumoto जनहित याचिकेत मा. न्यायालयाने खड्ड्यांमुळे अपघात झाल्यास संबधितांना वैद्यकीय खर्च, भरपाई देणे व संबधितावर कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यामुळे तात्काळ रस्ते दुरूस्तीसाठी निविदा प्रक्रीया करून कंत्राटदार नेमावे लागणार आहेत. सदरचे काम हे पॅनलव्दारे करण्यात येणार आहे. सदर कामासाठी सन 2025-26 व सन 2026-27 या आर्थिक वर्षाच्या "सार्व. रस्ते देखभाल/ दुरुस्ती/ पुर्नपृष्ठीकरण करणे" या लेखाशिर्षकातंर्गत तरतुद करून खर्च करण्यात येईल.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 73 नुसार मा प्रशासक यांच्या वित्तीय व प्रशासकीय मान्यतेसाठी व अधिनियमातील कलम 67 व 72(ब) नुसार सन 2025-26 व सन 2026-27 मधील अर्थसंकल्पीय तरतुदीत रु.50,00,00,000/- इतक्या रकमेच्या खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता तसेच पॅनल करणेसाठी 1 वर्ष मुदतीकरीता ई-निविदा मागविण्यासाठी प्रशासकीय ठरावाव्दारे मान्यता देणेस शिफारस आहे.

**(दिपक खांबित)**
**शहर अभियंता**
मिरा भाईंदर महानगरपालिका

**मा. आयुक्त यांच्या मान्यतेने**

PC-5/2025-26/DK/MG-13

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

प्रशासकीय ठराव दिनांक ३०|०९|२०२५

**प्रकरण क्रमांक :-(२४४)** मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विविध सेवा वाहीन्यांनी खोदलेले रस्ते, पावसाळयात पडणारे खड्डे यांची वार्षिक मुदतीने दुरुस्ती करणे. (ई-2416145)

**ठराव क्रमांक :- (२४४)**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात विविध ठिकाणी विविध सेवा संस्था पुरवठादारांमार्फत नविन वाहीन्या अंथरणे, फॉल्ट काढणे यासाठी रस्ते खोदण्यात येत असतात. पावसामुळे विविध ठिकाणी रस्त्यांवर खड्डे पडून रस्ते नादुरूस्त होतात. त्यामुळे सदर रस्त्यांवर अपघात होऊ नये म्हणून सदरील रस्त्यांची वेळोवेळी दुरूस्ती करणे आवश्यक आहे. मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील रस्ते दुरूस्ती कामी सन 2022-23 च्या राज्य दर सुचीनुसार रु.50,00,00,000/- इतक्या रक्कमेचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. सन 2025-26 या आर्थिक वर्षाच्या "रस्ते दुरुस्ती देखभाल दुरुस्ती पुर्नपृष्ठीकरण करणे" या लेखाशिर्षातून करावयाचे आहे. मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे सुरू असलेल्या 71/2013 sumoto जनहित याचिकेत मा. न्यायालयाने खड्ड्यांमुळे अपघात झाल्यास संबधितांना वैद्यकीय खर्च, भरपाई देणे व संबधितावर कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यामुळे तात्काळ रस्ते दुरूस्तीसाठी निविदा प्रक्रीया करून कंत्राटदार नेमावे लागणार आहेत. सदरचे काम हे पॅनलव्दारे करण्यात येणार आहे. सदर कामासाठी सन 2025-26 व सन 2026-27 या आर्थिक वर्षाच्या "सार्व. रस्ते देखभाल/ दुरुस्ती/ पुर्नपृष्ठीकरण करणे" या लेखाशिर्षकातंर्गत तरतुद करून खर्च करण्यात येईल.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुदी व विशेषत: कलम 452 (अ) च्या (1अ) व (1ब) नुसार, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक :- एमसीओ 2020/प्र.क्र.71 (भाग-2)/नवि-14 दिनांक 26 ऑगस्ट 2022 अन्वये प्राप्त अधिकारानुसार मी, राधाबिनोद अ. शर्मा, प्रशासक, मिरा भाईंदर महानगरपालिका महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 73 नुसार मा प्रशासक यांच्या वित्तीय व प्रशासकीय मान्यतेसाठी व अधिनियमातील कलम 67 व 72(ब) नुसार सन 2025-26 व सन 2026-27 मधील अर्थसंकल्पीय तरतुदीत रु.50,00,00,000/- इतक्या रकमेच्या खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता तसेच पॅनल करणेसाठी 1 वर्ष मुदतीकरीता ई-निविदा मागविण्यासाठी प्रशासकीय ठरावाव्दारे मान्यता देण्यात येत आहे.

वरील कामाबाबतची पुढील कार्यवाही नियमानुसार संबधित विभागाने विहित पध्दतीने करावी.

नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

**(राधाबिनोद अ. शर्मा, भाप्रसे)**
**प्रशासक तथा आयुक्त**
मिरा भाईंदर महानगरपालिका

**प्रत :- बांधकाम/ विद्युत विभागाकडे योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना**

PC-05/DK/25-26/MT-16

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## बांधकाम विभाग

## दि. ३०/०८ /2025

## //गोषवारा //

**प्रकरण क्र. (२४५) :- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विविध गटारे, नाले यावर विविध झाकणे वार्षिक मुदतीने बसविणे. (ई-2460441)**

- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विविध गटारे, नाले यावर विविध झाकणे व्दिवार्षिक मुदतीने बसविणेकामी सन 2024-25 मध्ये रु.8,00,00,000/- रकमेची व्दिवार्षिक निविदा प्रकिया पूर्ण करुन जा.क्र.मनपा/साबां/कार्या/013/ 2024-25 दि.12/08/2024 अन्वये मे. एन.जे. ब्रदर्स, यांना कार्यादेश देण्यात आलेले होते. सदर कामाची मुदत दि. 11/08/2026 पर्यंत आहे.
- शहरातील विविध गटारांवरील/फुटपाथवरील/क्रॉसिंगवरील विविध झाकणे बसविणेचे काम निधी अभावी अर्धवट स्थितीमध्ये आहे. मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील गटारांवर/फुटपाथवर/ क्रॉसिंगवर आर.सी.सी. झाकणे असून, सदरची झाकणे वारंवार तुटतात. व काही ठिकाणी अज्ञात इसमामार्फत सदर झाकणे तोडून, त्यामधील लोखंड विक्रीसाठी चोरले जातात. सदर बाबत पोलीस स्टेशनमध्ये गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत. या कारणास्तव मिरा भाईंदर शहरात टप्याटप्याने आर.सी.सी. झाकणे आवश्यकतेनुसार बदलून त्याजागी फायबरची झाकणे टाकणेचे काम सुरु आहे.
- सदर फायबरच्या झाकणांसाठी दर जास्त असल्यामुळे खर्च मोठ्या प्रमाणात होत आहे. मिरा भाईंदर शहरामध्ये एकुण सरासरी 1,00,061 (नग) आर.सी.सी. झाकणे आहेत. त्यापैकी आत्तापर्यंत 24,320 (नग) ची झाकणे फायबरच्या झाकणांमध्ये बदलण्यात आलेली आहेत. क्रॉसिंगवरील 3,655 (नग) ची झाकणे एमएसच्या झाकणांच्या स्वरुपात व उर्वरित आर.सी.सी. 72,086 (नग) फायबरच्या झाकणामध्ये बदलण्याचे काम प्रलंबीत आहे.
- सदर कामासाठी मोठ्या प्रमाणावर खर्च झालेला आहे. वरील सर्व बाबीमुळे सदर कामासाठी कार्यादेशानुसार निश्चित केलेली रक्कम संपत आलेली आहे. तुटलेले झाकण बसवून नविन झाकणे त्वरीत बसविणे आवश्यक आहे. अन्यथा उघड्या झाकणामुळे अपघात होऊन जिवित तसेच वित्तहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. गणपती/नवरात्र तसेच दिवाळी मध्ये नागरकि मोठ्या प्रमाणावर बाहेर पडत असल्याने गटारावर त्वरीत झाकणे बसविणे गरजेचे आहे. तसेच शाळा ठिकाणी मुलांची रहदारी मोठ्या प्रमाणावर असल्याने त्वरीत झाकणे बसविणे आवश्यक आहे.
- उपरोक्त बाबींचा विचार असता, सदर कामी तरतुद उपलब्ध नसल्याने नविन आर्थिक वर्षामध्ये तरतुद करण्यात येईल. व तद्नंतर देयक अदा करण्यात येतील, तोपर्यंत ठेकेदाराकडून झाकणे

बसविण्याचे काम करुन घेण्यात येतील नवीन वार्षिक निविदा पॅनल पध्दतीने काढणे आवश्यक आहे.

मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे सुरू असलेल्या 71/2013 याचिकेत मा. न्यायालयाने गटारावरील झाकणांमुळे अपघात झाल्यास संबधितांना भरपाई देणे व संबधितावर कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यामुळे निविदा प्रक्रीया करून कंत्राटदार नेमावेच लागणार आहेत. सदर काम हे तातडीचे व अत्यावश्यक असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 67 (3) (क) तरतुदीनुसार काम करावेच लागेल. त्यामुळे नवीन वार्षिक निविदा पॅनल पध्दतीने काढणे आवश्यक आहे. सदर कामी होणारा खर्च पुढील वर्षाच्या अर्थसंकल्पीय तरतुदीतून करण्यात येणार आहे. परंतु कंत्राटदार नेमून कामे करून घेण्यात येतील.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुदी विशेषत: कलम 452 (अ) च्या (1अ) व (1ब) नुसार, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक :- एमसीओ 2020/प्र.क्र.71 (भाग-2)/नवि-14 दिनांक 26 ऑगस्ट 2022 अन्वये प्राप्त अधिकारानुसार मी, राधाबिनोद शर्मा, प्रशासक, मिरा भाईंदर महानगरपालिका अधिनियमातील कलम 73 नुसार मा. प्रशासक यांच्या वित्तीय व प्रशासकीय मान्यतेसाठी व अधिनियमातील कलम 67 व 72(ब) नुसार सन 2025-26 व 2026-27 मधील अर्थसंकल्पीय तरतुदीतून रु. 6,00,00,000/- इतक्या रकमेच्या खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता तसेच पॅनल करणेसाठी 1 वर्ष मुदतीकरीता ई-निविदा मागविण्यासाठी प्रशासकीय ठरावाद्वारे मान्यता देणेस शिफारस आहे.

**(दिपक खांबित)**
**शहर अभियंता**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**(मा. आयुक्त यांचे मान्यतेने.)**

प्रशासकीय
मा. महासभा / स्थायी समिती सभा
गोषवारा प्राप्त दि. 30 / 09/2025 वेळ दु. 11.12 वा.
रजिस्टर नोंद अ.क्र. 242 वर्ष 2025-26
लिपीक
सचिव विभाग
मिरा-भाईंदर महानगरपालिका

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## प्रशासकीय ठराव दि. 30/08/2024

**विषय क्र. ( २४५ ) :- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विविध गटारे, नाले यावर विविध झाकणे वार्षिक मुदतीने बसविणे. (ई-2460441)**

## कार्यालयीन प्रस्तावना

ठराव क्र. २४५

- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विविध गटारे, नाले यावर विविध झाकणे व्दिवार्षिक मुदतीने बसविणेकामी सन 2024-25 मध्ये रु. 8,00,00,000/- रकमेची व्दिवार्षिक निविदा प्रकिया पूर्ण करुन जा.क्र.मनपा/साबां/कार्या/013/2024-25 दि.12/08/2024 अन्वये मे. एन.जे. ब्रदर्स, यांना कार्यादेश देण्यात आलेले होते. सदर कामाची मुदत दि. 11/08/2026 पर्यंत आहे.
- शहरातील विविध गटारांवरील/फुटपाथवरील/क्रॉसिंगवरील विविध झाकणे बसविणेचे काम निधी अभावी अर्धवट स्थितीमध्ये आहे. मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील गटारांवर/फुटपाथवर/ क्रॉसिंगवर आर.सी.सी. झाकणे असून, सदरची झाकणे वारंवार तुटतात. व काही ठिकाणी अज्ञात इसमामार्फत सदर झाकणे तोडून, त्यामधील लोखंड विक्रीसाठी चोरले जातात. सदर बाबत पोलीस स्टेशनमध्ये गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत. या कारणास्तव मिरा भाईंदर शहरात टप्याटप्याने आर.सी.सी. झाकणे आवश्यकतेनुसार बदलून त्याजागी फायबरची झाकणे टाकणेचे काम सुरु आहे.
- सदर फायबरच्या झाकणांसाठी दर जास्त असल्यामुळे खर्च मोठ्या प्रमाणात होत आहे. मिरा भाईंदर शहरामध्ये एकुण सरासरी 1,00,061 (नग) आर.सी.सी. झाकणे आहेत. त्यापैकी आत्तापर्यंत 24,320 (नग) ची झाकणे फायबरच्या झाकणांमध्ये बदलण्यात आलेली आहेत. क्रॉसिंगवरील 3,655 (नग) ची झाकणे एमएसच्या झाकणांच्या स्वरुपात व उर्वरित आर.सी.सी. 72,086 (नग) फायबरच्या झाकणामध्ये बदलण्याचे काम प्रलंबीत आहे.
- सदर कामासाठी मोठ्या प्रमाणावर खर्च झालेला आहे. वरील सर्व बाबीमुळे सदर कामासाठी कार्यादेशानुसार निश्चित केलेली रक्कम संपत आलेली आहे. तुटलेले झाकण बसवून नविन झाकणे त्वरीत बसविणे आवश्यक आहे. अन्यथा उघड्या झाकणामुळे अपघात होऊन जिवित तसेच वित्तहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. गणपती/नवरात्र तसेच दिवाळी मध्ये नागरकि मोठ्या प्रमाणावर बाहेर पडत असल्याने गटारावर त्वरीत झाकणे बसविणे गरजेचे आहे. तसेच शाळा ठिकाणी मुलांची रहदारी मोठ्या प्रमाणावर असल्याने त्वरीत झाकणे बसविणे आवश्यक आहे.
- उपरोक्त बाबींचा विचार असता, सदर कामी तरतुद उपलब्ध नसल्याने नविन आर्थिक वर्षामध्ये तरतुद करण्यात येईल. व तद्नंतर देयक अदा करण्यात येतील, तोपर्यंत ठेकेदाराकडून झाकणे बसविण्याचे काम करुन घेण्यात येतील नवीन वार्षिक निविदा पॅनल पध्दतीने काढणे आवश्यक आहे.

मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे सुरू असलेल्या 71/2013 याचिकेत मा. न्यायालयाने गटारावरील झाकणांमुळे अपघात झाल्यास संबधितांना भरपाई देणे व संबधितावर कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत.

त्यामुळे निविदा प्रक्रीया करून कंत्राटदार नेमावेच लागणार आहेत. सदर काम हे तातडीचे व अत्यावश्यक असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 67 (3) (क) तरतुदीनुसार काम करावेच लागेल. त्यामुळे नवीन वार्षिक निविदा पॅनल पध्दतीने काढणे आवश्यक आहे. सदर कामी होणारा खर्च पुढील वर्षाच्या अर्थसंकल्पीय तरतुदीतून करण्यात येणार आहे. परंतु कंत्राटदार नेमून कामे करून घेण्यात येतील.

सदर कामी विभाग प्रमुख यांनी सादर केलेला अहवालाची तपासणी करुन सदर कामास प्रशासकीय व आर्थिक मान्यता मिळणेस शिफारस केलेली आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुदी विशेषत: कलम 452 (अ) च्या (1अ) व (1ब) नुसार, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक :- एमसीओ 2020/प्र.क्र.71 (भाग-2)/नवि-14 दिनांक 26 ऑगस्ट 2022 अन्वये प्राप्त अधिकारानुसार मी, राधाबिनोद शर्मा, प्रशासक, मिरा भाईंदर महानगरपालिका अधिनियमातील कलम 73 नुसार मा. प्रशासक यांच्या वित्तीय व प्रशासकीय मान्यतेसाठी व अधिनियमातील कलम 67 व 72(ब) नुसार सन 2025-26 व 2026-27 मधील अर्थसंकल्पीय तरतुदीतून रु. 6,00,00,000/- इतक्या रकमेच्या खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता तसेच पॅनल करणेसाठी 1 वर्ष मुदतीकरीता ई-निविदा मागविण्यासाठी प्रशासकीय ठरावाद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

वरील कामाबाबतची पुढील कार्यवाही नियमानुसार संबधित विभागाने विहित पध्दतीने करावी.

नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

**(राधाबिनोद शर्मा, भाप्रसे)**
**प्रशासक तथा आयुक्त**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रत बांधकाम विभागाकडे योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना**